# कार्यकारी सारांश

## मॅंगनीज ओरच्या सद्याच्या ग्राइंडिंग व स्क्रीनिंग युनिट मध्ये रोस्टिंग फर्नेसद्वारे 30,000 TPA मॅंगनीज ऑक्साइड आणि 12,000 TPA मॅंगनीज सल्फेट उत्पादन प्रकल्पचा विस्तारिकरण प्रस्ताव

प्लॉट क्रमांक A–12, A–13, A–14, A–15, मोहाडी MIDC तसेच खासगी जमीन, खसरा क्रमांक 137/1, मौजा वडेगाव, तालुका मोहाडी, जिल्हा भंडारा, महाराष्ट्र.

तर्फे

*प्रकल्प प्रवर्तक*

*मेसर्स दहरवाल्स मिनेरल्स प्रायवेट लिमिटेड*

पर्यावरणीय सल्लागार

**पोल्यूशन एण्ड इकॉलॉजी कन्ट्रोल सर्विसेस (PECS)**
धंतोली पोलिस स्टेशन जवळ, धंतोली, नागपूर, महाराष्ट्र
***Email: pecsnagpur@gmail.com***
***Accreditation no.:NABET/EIA/25-28/RA0474***
***Valid upto 16th October 2028***

**कार्यकारी सारांश**

## 1.0 प्रस्तावना

मेसर्स दहरवाल्स मिनरल्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी सद्याच्या मॅगनीज ओरच्या ग्राइंडिंग व स्क्रीनिंग युनिटच्या विस्ताराचा प्रस्ताव सादर केला आहे. या विस्तारामध्ये रोस्टिंग फर्नेसद्वारे 30,000 TPA मॅगनीज ऑक्साइड उत्पादन तसेच 12,000 TPA मॅगनीज सल्फेट उत्पादन करण्याचा समावेश आहे. हा प्रकल्प प्लॉट क्रमांक A–12, A–13, A–14, A–15, मोहाडी MIDC तसेच खासगी जमीन, खसरा क्रमांक 137/1, मौजा वडेगाव, तालुका मोहाडी, जिल्हा भंडारा, महाराष्ट्र येथे प्रस्तावित आहे. प्रकल्प प्रस्तावकाने या प्रकल्पासाठी MIDC व खासगी मिळून एकूण 9,652 चौ. मी. जमीन संपादित केली आहे. प्रस्तावित प्रकल्प EIA अधिसूचना 2006 तरतूदीं व त्यातील दुरूस्तीनुसार आहे व प्रकल्प अनुसूची 3 (a) धातु कारखाना (फेरो व नॉनफेरो) अंतर्गत वर्ग–अ मध्ये वर्गीकृत आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी EIA चा सविस्तर अभ्यास करण्यासाठी संबंधित नियामक अधिकाऱ्यांकडून विचारार्थ विषय (TOR) प्राप्त करण्याकरिता फॉर्म–1, पूर्व–व्यवहार्यता अहवाल व इतर दस्तऐवजांसह पत्र क्र. IA/MH/IND1/543743/2026 दिनांक 20/02/2026 ला ऑनलाइन अर्ज केला होता समिती ने पत्र क्र. IA-J-11011/414/2025-IA-II(Ind-I) दिनांक 01 मार्च 2026 द्वारे प्रमाणित TOR निर्धारित केले होते.




**Source: SOI Toposheet**

**स्थलाकृति नकाशा (10 km Radius)**




**प्लांट लेआऊट**

## 2.0 प्रकल्पाचे वर्णन

| अनु क्र. | विवरण | माहिती |
|---|---|---|
| 1 | प्रकल्पाचे स्वरूप | मेसर्स दहरवाल्स मिनेरल्स प्रायवेट लिमिटेड |
| 2 | प्रकल्प स्थळ | प्लाट नं. A-12, A-13, A-14, A-15, मोहाडी MIDC आणि खाजगी जमिन खसरा नं. 137/1, मौजा-वडेगांव, तालुका-मोहाडी आणि जिल्हा भंडारा, महाराष्ट्र. |
| 3 | कॉन्फिगरेशन | मॅगनीज ओरच्या सद्याच्या ग्राइंडिंग व स्क्रीनिंग युनिट मध्ये रोस्टिंग फर्नेसद्वारे 30,000 TPA |

| | | |
|---|---|---|
| | | मॅगनीज ऑक्साइड आणि 12,000 TPA मॅगनीज सल्फेट उत्पादन प्रकल्प विस्तारिकणाचा प्रस्ताव |
| 5 | प्रस्तावित प्रकल्पासाठी पाण्याची गरज | आवश्यकता: 50 KLD<br>स्त्रोत: MIDC |
| 6 | विजेची आवश्यकता आणि स्त्रोत | आवश्यकता: 500 KW<br>स्त्रोत: राज्य विद्युत मंडळ |
| 7 | प्रस्तावित प्रकल्पासाठी जमीन | एकुण जमिन : 9652 Sq. Mtrs<br>(2352 sq. Mtrs.MIDC Land + 7300 sq. Mtrs खाजगी जमिन) |
| 8 | युनिट कार्यान्वित झाल्यानंतर एकूण मनुष्यबळ | 60 |
| 9 | पर्यावरणीय पैलू | **वायू पर्यावरण**<br>प्रस्तावित प्रकल्पामध्ये मॅगनीज ओरचे कोकसह रोस्टिंग (भाजणी) करताना तसेच मॅगनीज ओरच्या ग्राइंडिंग प्रक्रियेदरम्यान उत्सर्जन होण्याची शक्यता आहे. PM चे उत्सर्जन निर्धारित मानकांच्या मर्यादेत नियंत्रित ठेवण्यासाठी 8 रोस्टिंग फर्नेसला वेट स्क्रबर प्रणालीशी जोडण्यात येईल. या प्रणालीस 30 मीटर उंचीच्या दोन चिमन्या जोडल्या जातील, ज्याद्वारे उत्सर्जित वायू वातावरणात सोडले जातील.<br><br>• प्रकल्प प्रवर्तक धूळ शोषक प्रणाली उपलब्ध करून देतील, जी साहित्य आणि कच्च्या मालाच्या हाताळणीमुळे होणारे अनियंत्रित उत्सर्जन नियंत्रित करेल.<br>• पाणी फवारणी करून धूळ नियंत्रण प्रणाली पुरवली जाईल.<br>• वायुतील प्रदूषकांच्या प्रमाण, इत्यादींचे नियमित निरीक्षण करण्यात येईल<br>**जल:**<br>• फर्नेस कूलिंग आणि जिगिंग प्रक्रियेतील सांडपाणी pH समायोजनासाठी न्यूट्रलायझेशन टँकमध्ये गोळा केले जाईल आणि सेटलिंग टँकमध्ये साठवले जाईल, ज्याचा पुढे प्रक्रियेत पुनर्वापर केला जाईल. |

| | | |
|---|---|---|
| | | • स्वच्छताविषयक उपक्रमांमधून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर STP प्रक्रिया करण्यात येईल. |
| 9 | प्रकल्पाचा अंदाजित खर्च | 16 कोटी |

## 3.0 प्रक्रिया वर्णन

### मॅगनीज ऑक्साइडची उत्पादन प्रक्रिया

- प्रकल्प क्षेत्रात कच्चा माल प्राप्त झाल्यानंतर त्यात असलेल्या विविध घटकांची चाचणी केली जाते व नंतर त्या मालाला चाळल्या जाते. चाळल्या नंतर विविध आकाराचे सामग्री प्राप्त होते जी पाण्याने झिगिंग केल्या जाते.
- त्यानंतर ती सामग्री कोळशाने जळलेल्या भट्टीमधे 10–12 तापविण्यात येते. फर्नेस थंड झाल्यानंतर कोरडे करण्याकरिता व चुंबकीय विभाजनाकरिता पाठविल्या जाते.
- यानंतर त्या सामग्रीला (लाकडाने जळणाऱ्या तापलेल्या प्लेट ड्रायर) द्वारे कोरडे केले जात व मॅग्नेटिक सेपरेशन नंतर त्याला ग्राईडिंग यंत्रात भरल्या जाते, जिथे ते आवश्यक सुक्ष्म आकारात करण्यात येते
- ग्राईडिंग झाल्यानंतर सामग्रीच्या सेमी स्वंयचलित पध्दती द्वारे 25 kg/50 kg/ or 100 kg HDPE च्या पिशव्या तयार केले जाते व पाठविण्या करिता तयार करून ठेवल्या जाते.

**चुंबकीय विभाजन :** मॅगनीज ओर हे एक कमकुवत चुंबकीय खनिज आहे, त्यामुळे मॅगनीज ओरच्या प्रभावी विभाजनासाठी प्रबल चुंबकीय विभाजन पद्धतीचा वापर केला करण्यात येईल. प्रबल चुंबकीय विभाजन उपकरणाच्या चुंबकीय क्षेत्राची तीव्रता 14000 गॉसपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. मॅगनीजचे योग्य प्रमाण मिळवण्यासाठी फरकाची वर्गवारी केली जाते. मॅगनीज ओरचे चुंबकीय विभाजन प्रामुख्याने मॅगनीज ऑक्साईड ओरच्या शुद्धीकरणासाठी योग्य आहे, ज्याला सामान्यतः एक सहायक शुद्धीकरण प्रक्रिया म्हणून ओळखले जाते.

## उत्पादन प्रक्रिया

हा प्रस्तावित प्रकल्प मॅगनीज ऑक्साईडचे क्रशिंग, स्क्रीनिंग, जिगिंग, भट्टीत भाजणे, वाळवणे आणि ग्राइंडिंग या प्रक्रियांसाठी आहे. उत्पादन प्रक्रिया दर्शवणारी प्रवाह आकृती खालील दिली आहे.




**MnO उत्पादनाची प्रक्रिया प्रवाह आकृती**

## मॅगनीज सल्फेटची उत्पादन प्रक्रिया

सल्फ्यूरिक एसिडमध्ये मॅगनीज ऑक्साईड मिसळून ते मिश्रण जोरात मिक्स केले. त्यानंतर, हे द्रावण फिल्टर प्रेसद्वारे गाळून घेतले जाते आणि स्फटिक मिळवण्यासाठी ते थंड केले जाते.

## प्रवाह आकृती:




**मॅगनीज सल्फेटची उत्पादन प्रक्रिया**

## 4.0 पर्यावरणाचे वर्णन

परिवेशी हवा गुणवत्ता मोजण्या करिता प्रमुख वायु दिशेवर आधारित 8 ठिकाणांची निवड करण्यात आली, खालील श्रेणीत आढळली.

$PM_{10}$ : 45.95 – 61.32 µg/$m^3$

$PM_{2.5}$ : 40.94 – 45.95 µg/$m^3$

$SO_2$ : 28.96 – 31.80 µg/$m^3$

$NO_x$ : 37.68 – 42.89µg/$m^3$

| आद्योगिक क्षेत्र निवासी, ग्रामिण P क्षेत्र (CPCB मानक) M | $PM_{10}$ | $PM_{2.5}$ | $SO_2$ | NOx |
|---|---|---|---|---|
| | 100 µg/$m^3$ | 60 µg/$m^3$ | 80 µg/$m^3$ | 80 µg/$m^3$ |

PM 10, $PM_{2.5}$, $SO_2$, o NOx ची तिव्रता राष्ट्रीय परिवेशी गुणवत्ते च्या प्रमाणत (NAAQ) आढळली.

### जल पर्यावरण

आठ भुपृष्ठजल आणि आठ भूजलाचे असे एकूण 16 नमुने संकलित करून त्यांचे विश्लेषण करण्यात आले. अमेरिकन पब्लिक हेल्थ असोसिएशन (APHA) पब्लिकेशनच्या स्टँडर्ड मेथड्स फॉर ॲनालिसिस ऑफ वॉटर अँड वेस्टवॉटरनुसार पाण्याच्या नमुन्यांचे विश्लेषण करण्यात आले.. माहितीनुसार असे निदर्शनास आले की भुजल तसेच भूपृष्ठजलाची गुणवत्ता पिण्याचे पाणी हे कोलीफॉर्म सोडून हे (BIS

10500-2012) ने निर्धारित केलेल्या अनुसंबंधित प्रमाणांच्या आत होतो. भुपृष्ठ जलात कोलीफॉर्म आढळले जे मानवी वापरामुळे आहे.

## ध्वनी पर्यावरण

असे निरिक्षण करण्यात आले कि, प्रस्तावित विस्तारित प्रकल्पामध्ये सर्व आठ निरिक्षण स्थळांवर 37.0 dB(A) (रात्रीच्या वेळी) आणि 51.0 dB(A) दिवसाला या श्रेणीत नोंदविण्यात आली जे स्वाभाविक आहे कारण अधिकांश कामे ही दिवसाच्या वेळी केली जातात.

सर्व आठ स्थळांवर मोजण्यात आलेली ध्वनि पातळी मर्यादेत आहे. ध्वनि पातळी मानकाकरिता MoEF&CC राजपत्र अधिसूचनेत दिल्याप्रमाणे रहिवासी 65.0 dB(A) किंवा औद्योगिक क्षेत्राकरिता 75.0 dB(A) च्या मर्यादेत आहे.

## मृदा पर्यावरण

प्रस्तावित प्रकल्प क्षेत्राच्या सभेवतालील परिसरातील सद्याच्या मृदा अवस्थेतील मातीचे भौतिक–रासायनिक गुणवैशिष्ट्यांचे मुल्यांकन करण्याकरिता अभ्यास क्षेत्रातील निवड केलेल्या स्थळांवर मृदाचे आठ नमुने संकलित व विश्लेषीत करण्यात आले. संबंधित घटक खालील लक्षणे दर्शवितात.

- सर्व संकलित मृदा नमुन्यांची पोत सिल्टी लोम यात वर्गीकृत करण्यात आली
- कृषक व पडित जमिनीच्या मातीच्या संकलित नमुन्याचा रंग पिवळा, तपकीरी आणि लाल आहे.
- मृदा गोळा केलेल्या नमुन्यात स्थूल घनता 1.28 ते 1.44 gm/cc आहे.
- मृदा नमुन्यामधे pH ची मात्रा 7.44 ते 7.72 श्रेणीत आहे. pH मात्रा मृदा नमुने निष्क्रिय असल्याचे दर्शविते
- मृदा नमुन्यामधे वाहकता 296.4 व 354.1 µmhos/cm श्रेणीमधे आहे.
- मृदा नमुन्यामधे जैविक पदार्थ 1.28 ते 1.55 % च्या मधे आहे. जे जमिनीची सुपिकता दर्शवितात.
- मृदा नमुन्यामधे उपलब्ध नायट्रोजनची तीव्रता 0.14 ते 0.24 kg/ha च्या श्रेणित आहे.

- मृदा नमुन्यात उपलब्ध फॉस्फोरसची तिव्रता 0.02 ते 0.07 kg/ha आहे.
- मृदा नमुन्यात उपलब्ध पोटॅशियमची तिव्रता 9.62 ते 14.16 kg/ha आहे.
- मृदा नमुन्यात उपलब्ध क्लोराइडची तिव्रता 18.6 ते 24.2 kg/ha आहे.

## 5.0 संभावित पर्यावरणीय प्रभाव आणि नियंत्रण उपाय

### वायु पर्यावरण

प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये, कोकच्या साहाय्याने मॅगनीज खनिजाचे रोस्टिंग आणि ग्राइंडिंग करण्याच्या प्रक्रियेदरम्यान 8 फर्नेस पासून उत्सर्जन होण्याची शक्यता आहे. 30 मी. उंचीची एक सामायिक चिमनी 4 रोस्टिंग फर्नेसला जोडलेली असेल.

प्रस्तावित प्रकल्पामुळे खालील ठिकाणांवरून वायु उत्सर्जन होईल.

अ) कच्च्या मालाची हाताळणी आणि साठवणूक क्षेत्र

ब) फर्नेस (MnO)

क) वाहतूक

### नियंत्रण उपाययोजना

### अ) कच्च्या मालाची हाताळणी आणि साठवणूक

- मॅगनीज ओर आणि कोक यांच्या साठ्याला आच्छादित करणे..
- माल अनलोडींगच्या आणि साठवणुकीच्या ठिकाणी पाणी फवारणे/फॉगिंग करणे.
- स्थानांतरण केंद्राला आवरण करणे आणि रस्त्यांची नियमित साफसफाई करणे
- प्लांटच्या सभोवती हरितपट्टा विकसित करणे.

### ब) फर्नेस (MnO Production)

- आठ रोस्टिंग फर्नेस, ज्या वेट स्क्रबर्सद्वारे 30 मीटर उंच अशा दोन सामायिक चिमन्यांना जोडलेल्या असतील.
- कणांचे उत्सर्जन नियंत्रित करण्यासाठी वेट स्क्रबर्सची तरतूद करण्यात येईल.
- PM उत्सर्जन 30 mg/Nm$^3$ पेक्षा कमी राखण्यासाठी ग्राइंडिंग युनिट डस्ट कलेक्टर्स आणि बॅग फिल्टर्ससह सुसज्ज राहिल.

- प्रदूषण नियंत्रण उपकरणांची नियमित देखभाल आणि देखरेख.

### ब) वाहतूक

- माल वाहतुकीदरम्यान वाहने ताडपत्रीने आच्छादित करण्यात येतील.
- अंतर्गत रस्त्यांवर नियमित पाणी फवारण्यात येईल.
- वेगावर नियंत्रण आणि वाहनांची योग्य देखरेख करण्यात येईल
- रस्ते आणि प्लांटच्या सीमांलगत हरितपट्टा विकसित करण्यात येईल

## 6.0 मॉडेलिंगच्या परिणामांवरील चर्चा

प्रस्तावित प्रकल्पामुळे $PM_{10}$, $PM_{2.5}$, $SO_2$ आणि $NO_x$ यांच्या वाढीव भूपातळी सांद्रतेचा अंदाज घेण्यासाठी, प्रकल्पाच्या ठिकाणची विशिष्ट सूक्ष्म–हवामानविषयक माहिती वापरून वायु अपस्करण मॉडेलिंग करण्यात आले. अंदाजित कमाल वाढीव सांद्रता खालीलप्रमाणे आढळली $PM_{10}$ करिता 0.577 $\mu g/m^3$, $PM_{2.5}$ करिता 0.348 $\mu g/m^3$, $SO_2$ करिता 0.934 $\mu g/m^3$ आणि $NO_x$ करिता 0.440 $\mu g/m^3$ करिता. ही कमाल पातळी प्रकल्पाच्या ठिकाणापासून ईशान्य (NE) दिशेला 400 ते 550 मीटर अंतरावर दिसून आली. अभ्यासाच्या कालावधीतील प्रचलित वायुच्या दिशेशी सुसंगत अशी, ईशान्य दिशेला सर्वाधिक परिणाम दिसून आले आहेत.

परिसरातील हवेच्या गुणवत्तेचे निरीक्षण करणाऱ्या सर्व ठिकाणांवर अंदाजित वाढीव प्रमाण ही विद्यमान मूळ (बेसलाईन) प्रमाणाच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. मूळ मूल्यांवर अंदाजित वाढीव प्रमाणाची बेरीज करून काढलेली प्रकल्पोत्तर एकूण प्रमाण, प्रदूषकांच्या पातळीत केवळ नगण्य वाढ दर्शवते.

प्रकल्पोत्तर कमाल प्रमाण खालीलप्रमाणे आहे:

- $PM_{10}$: खरबी या गावामध्ये $PM_{10}$ चे प्रमाण 67.57 $\mu g/m^3$
- $PM_{2.5}$: प्रकल्पाच्या ठिकाणी 28.35 $\mu g/m^3$
- $SO_2$ : खरबी या गावामध्ये $SO_2$ चे प्रमाण 43.08 $\mu g/m^3$
- $NO_x$ : प्रकल्पाच्या ठिकाणी 44.47 $\mu g/m^3$

मॉडेलिंगचे निष्कर्ष दर्शवतात की, प्रस्तावित प्रकल्पाचा अभ्यास क्षेत्रातील वायुच्या गुणवत्तेवर केवळ नगण्य परिणाम होईल. विद्यमान मूळ संहतीचा एकत्रित परिणाम विचारात घेतल्यानंतरही, सर्व प्रदूषकांची अंदाजित प्रकल्पोत्तर प्रमाण ही विहित राष्ट्रीय परिवेशी वायु गुणवत्ता मानकांच्या (NAAQS) मर्यादेत आहेत. त्यामुळे, प्रस्तावित वायुप्रदूषण नियंत्रण प्रणालींची उभारणी व योग्य कार्यपद्धती आणि पर्यावरण व्यवस्थापनाच्या चांगल्या पद्धतींचा अवलंब केल्यास, या प्रकल्पामुळे परिसरातील वायुच्या गुणवत्तेवर कोणताही लक्षणीय विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाही.

## ध्वनि प्रदूषण व नियंत्रण उपाय योजना

प्रस्तावित प्रकल्पाच्या प्रक्रिये दरम्यान, प्रामुख्याने प्रकल्पातील यंत्रसामग्री ध्वनिचे निर्माण होण्याचे स्त्रोत आहेत. कोणत्याही परिस्थितीत या स्रोतांपासून निर्माण होणारी ध्वनिची पातळी 75 dB (A) पेक्षा जास्त असणार नाही. प्रकल्पस्थळी निर्माण होणारी ध्वनि प्रस्तावित प्रकल्पाच्या आवारातच मर्यादित राहील, त्यामुळे परिसरावर होणारा ध्वनिचा परिणाम नगण्य राहिल.

## नियंत्रण उपाय

ध्वनिची पातळी कोणत्याही वेळी केंद्रीय प्रदूषण मंडळाद्वारे ठरविलेल्या मानकापेक्षा अधिक असणार नाही.

- विविध उपकरणांच्या नियमित देखरेखी व्यतिरिक्त अधिक ध्वनी असलेल्या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना ईअर मफलर, ईअर प्लग/ईअर मफ पुरविण्यात येईल.
- सर्व फिरत्या वस्तुंना चांगल्या प्रकारे ऑयलिंग करण्यात येईल व ध्वनि संचार शक्य तितके कमी करण्याकरिता आवरण पुरविण्यात येतील.

## पाण्यावर प्रभाव

एकूण प्रस्तावित विस्तारित प्रकल्पाकरिता एकूण 50 KLD पाण्याची आवश्यकता राहील. प्रक्रियेमध्ये रोल्सच्या कुलिंगकरिता पाण्याचा क्लोल्ड लूपचा वापर केला

जाणार असल्यामुळे पाण्याच्या गुणवत्तेवर कोणताही परिणाम होणार नाही. घरगुती वापरातून सुमारे 2.5 KLD सांडपाणी निर्माण होईल. हे सांडपाणी STP प्रक्रिया करून त्यातील (BOD, COD, TSS,TN इत्यादी) घटकांचे प्रमाण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (MPCB) निर्धारित केलेल्या अनुज्ञेय मर्यादेपेक्षा कमी करण्यात येतील. शुद्ध केलेले कोणतेही सांडपाणी कारखाना परिसराच्या बाहेर सोडण्यात येणार नसल्यामुळे, परिसरातील कोणत्याही भुपृष्ठभागावरील जलस्रोतांच्या पाण्याच्या गुणवत्तेवर कोणताही प्रतिकूल परिणाम होणार नाही.

## नियंत्रण उपाय

### पॅकेज्ड टाइप STP

पॅकेज्ड एसटीपी (Packaged STP) ची रचना अशा प्रकारे केली गेली आहे की, त्याद्वारे प्रक्रिया केलेल्या सांडपाण्यातील घटक (जसे की BOD, COD, TSS, TN इत्यादी) प्रदूषण नियंत्रण मंडळाने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा खाली आणले जातात. या प्रणालीमध्ये MBBR (Moving Bed Biofilm Reactor) तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. जे कार्यक्षम जैविक प्रक्रिया, स्थिर प्रक्रिया–कार्य आणि प्रकल्पाच्या आवारात पुनर्वापरासाठी योग्य अशी सातत्यपूर्ण दर्जाची प्रक्रिया केलेली पाणी–गुणवत्ता प्रदान करते.

## घनकचरा निर्मिती

घनकचरा व घातक कचरा निर्मिती आणि नियंत्रण उपाय खालील तक्त्यात दिलेले आहे.

| Sr. No. | घनकचरा | प्रस्तावित मात्रा (TPA) | विल्हेवाट / वापर |
|---|---|---|---|
| 1. | हार्ड कोक एश | 800 | वीट उत्पादकांना विकले जाईल |
| 2. | फायरवुड | 240 | वीट उत्पादकांना विकले जाईल |
| 3. | फिल्टर केक ($MnSO_4$) | 360 | ड्राइड टेलिंग (high $SiO_2 + Fe_2O_3$) संयोजक म्हणून सिमेंट मध्ये वापरण्यात येतील किंवा विटांमध्ये क्लेच्या ऐवजी वापरण्यात येईल. |

## 6.0 पर्यावरणात्मक निरिक्षण कार्यक्रम

प्रकल्पाच्या बांधकाम व प्रक्रिया टप्प्यांदरम्यान CPCB/SPCB मानकांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी तसेच प्रदूषण नियंत्रण उपाययोजनांची परिणामकारकता तपासण्यासाठी पर्यावरणीय निरीक्षण कार्यक्रम (EMP) राबविण्यात येईल. निर्धारित नियमांनुसार नियमित अंतराने परिवेशी वायुची गुणवत्ता ($PM_{10}$, $PM_{2.5}$, $SO_2$, NOx), चिमनीतील उत्सर्जन (Stack Emissions), पाण्याची गुणवत्ता, ध्वनी पातळी आणि मातीची गुणवत्ता यांचे निरीक्षण केले जाईल.

निरीक्षणाशी संबंधित सर्व कामकाजाचे पर्यवेक्षण करण्यासाठी, नोंदी राखण्यासाठी आणि नियामक प्राधिकरणांना वेळेवर अहवाल सादर करण्यासाठी स्वतंत्र पर्यावरण व्यवस्थापन सेल स्थापन करण्यात येईल. हा कार्यक्रम संभाव्य पर्यावरणीय परिणामांचे लवकर निदान करण्यास आणि आवश्यक सुधारात्मक उपाययोजना तात्काळ राबविण्यास मदत करेल, ज्यामुळे प्रकल्पाचे शाश्वत व पर्यावरणपूरक संचालन सुनिश्चित होईल.

## 7.0 अतिरिक्त अभ्यास

सार्वजनिक सल्लामसलत, जोखीम मूल्यांकन आणि आपत्ती व्यवस्थापन योजना हे MoEF&CC ने जारी केलेल्या ToR. नुसार केलेला अतिरिक्त अभ्यास आहे.

## 8.0 प्रकल्पांचे फायदे

### कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (CER)

विकासात्मक उपक्रम हे सामुदायिक प्राधान्य आणि स्थानिक योगदानावर आधारित असले पाहिजेत. सामाजिक प्रभाव मूल्यांकनाद्वारे आणि जनसुनावणी दरम्यान उपक्रमादरम्यान विचारात घेण्यात आलेल्या CER उपक्रमातंर्गत ओळखली जाणारी महत्त्वाची क्षेत्र आहेत. या दृष्टिकोनामुळे गट मजबूत होतील, सदस्यांना सक्षम बनवले जाईल आणि स्थानिक लोकांना फायदा होईल.

### CER बजेट

प्रस्तावित रू. 8.00 लाखांचे भांडवली अंदाजपत्रक हे कॉर्पोरेट पर्यावरणीय उत्तरदायित्व (CER) उपक्रमांवर तीन वर्षांच्या कालावधीत खर्च करण्यात येईल.

- अंतिम CER बजेट जनसुनावणी आयोजित केल्या नंतर जनसुनावणी दरम्यान उपस्थित मुद्द्यानुसार निश्चित करण्यात येईल.
- जनसुनावणी दरम्यान उपस्थित मुद्द्यानुसार विविध उपक्रमांवर निधी खर्च करण्यात येईल.
- CER उपक्रम यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर CSR करिता आणखी गाव निवडण्यात येतील.
- प्रकल्प कार्यान्वित असे पर्यंत CSR उपक्रम नियमित राहिल.

## 9.0 पर्यावरणीय व्यवस्थापन योजना

बांधकाम आणि ऑपरेशन टप्प्यांमध्ये पर्यावरण व्यवस्थापन योजनेचे पालन केले जाईल. पर्यावरणीय संरक्षणाकरिता प्रकल्पात EMP अंतर्गत भांडवली कामांच्या अंमलबजावणीसाठी रू.1.28 करोड बजेट निश्चित करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त, रू. 12 लाख प्रति वर्ष खर्चाकरिता निश्चित करण्यात येतील.

### हरित पट्ट्याचा विकास

मेसर्स दहरवाल्स मिनरल्स प्रायव्हेट लिमिटेडने हरित पट्टा विकसित करण्यासाठी सुमारे 0.24 हेक्टर (एकूण प्रकल्प क्षेत्राच्या 25%) जागा निश्चित केली आहे. प्रकल्पाच्या सभोवतालचा हा हरित पट्टा किंवा वृक्षारोपण क्षेत्र, प्रकल्प आणि परिसर यांच्यात एक संरक्षक अडथळा म्हणून कार्य करेल. या हरित पट्ट्यामुळे हवेत पसरणारे सूक्ष्म कण व वायू उत्सर्जन रोखण्यास आणि ध्वनीची पातळी कमी करण्यास मदत होईल, ज्यामुळे वायुची गुणवत्ता व ध्वनीविषयक मानके राखली जातील. याव्यतिरिक्त, यामुळे सभोवतालचा पर्यावरणीय सौंदर्यातही वाढ होईल.

## 10.0 निष्कर्ष

मेसर्स दहरवाल्स मिनरल्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी मॅंगनीज ओरच्या सद्याच्या ग्राइंडिंग व स्क्रीनिंग युनिट मध्ये रोस्टिंग फर्नेसद्वारे 30,000 TPA मॅंगनीज ऑक्साइड आणि 12,000 TPA मॅंगनीज सल्फेट उत्पादन प्रकल्पचा विस्तारिकरण प्रस्ताव करण्याचा समावेश आहे. हा प्रकल्प प्लॉट क्रमांक A–12, A–13, A–14, A–15, मोहाडी MIDC तसेच खासगी जमीन, खसरा क्रमांक 137/1, मौजा वडेगाव,

तालुका मोहाडी, जिल्हा भंडारा, महाराष्ट्र येथे प्रस्तावित आहे व हा प्रदेशाच्या औद्योगिक वाढीस आणि सामाजिक–आर्थिक विकासास हातभार लावणारा ठरेल. अभ्यास क्षेत्रातील मूलभूत पर्यावरणीय गुणवत्ता निर्धारित मानकांच्या मर्यादेत असून, अपेक्षित पर्यावरणीय परिणाम प्रस्तावित प्रदूषण नियंत्रण प्रणाली आणि पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (EMP) यांच्या माध्यमातून प्रभावीपणे कमी करता येऊ शकतात. वायू प्रदूषण नियंत्रण, सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा हाताळणी, हरित पट्टा विकास तसेच व्यावसायिक आरोग्य व सुरक्षितता यासाठी पुरेशा उपाययोजना राबविण्यात येतील. आवश्यक पर्यावरणीय संरक्षणात्मक उपाययोजनांचा अवलंब आणि वैधानिक अटींचे पालन केल्यास, प्रस्तावित प्रकल्प पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत पद्धतीने विकसित व कार्यान्वित केला जाऊ शकतो.